सन २०१५-१६ या वित्तीय वर्षात राज्य योजनांतर्गत योजनेच्या मंजूर तरतूदीमधून राज्यातील कारागृहात व न्यायालयाकरीता व्हिडीओ कॉन्फरंन्सींग सोई सुविधेमध्ये वाढ करण्याच्या दृष्टीने व्हिडीओ कॉन्फरंन्सिंग उपकरणे खरेदी करण्यासाठी येणाऱ्या खर्चाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय क्रमांकः जेएलएम-१३१५/प्र.क्र.२६७/तुरुंग-२
मंत्रालय, दुसरा मजला, मुख्य इमारत,,
मादाम कामा रोड, मुंबई-४०० ०३२.
दिनांक: ३१ डिसेंबर, २०१५.

वाचा

१) अपर पोलीस महासंचालक व कारागृह महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे जा. क्र. पुर्ननियोजन/व्हिसी/१२४००/२०१५ /कक्ष ६(१) दिनांक ०४.१२.२०१५.
२) अपर पोलीस महासंचालक व कारागृह महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे जा. क्र. पुर्ननियोजन/व्हिसी/१२५३९/२०१५ /कक्ष ६(१) दिनांक ०८.१२.२०१५.
३) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र. असंक-२०१५/प्र.क्र.८५/अर्थ-३, दिनांक १७.०४.२०१५.
४) शासन निर्णय भांखस-२०१४/प्र.क्र.८२/ भाग-/ उद्योग -४ दि.३०/१०/२०१५

शासन निर्णय

राज्यातील कारागृह व न्यायालयातील व्हिडीओ कॉन्फरंन्सिंग सुविधेत वाढ करण्याच्या दृष्टीने व्हिडीओ कॉन्फरंन्सींग उपकरणे खरेदी करण्यासाठी सन २०१५-१६ या वित्तीय वर्षात राज्य योजनांतर्गत योजनेच्या मंजूर तरतूदीमधून रुपये १६०.०० लक्ष (रुपये एक कोटी साठ लक्ष फक्त) इतकी रक्कम अर्थसंकल्पित करण्यात आली आहे. सदर मंजूर तरतूदीमधून उपरोक्त संदर्भ २ मध्ये नमुद व्हिडीओ कॉन्फरंन्सींग उपकरणाच्या प्रस्तवित खरेदीस निम्न नमुद अटी व शर्तीच्या अधिनरीहुन प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

१) उपरोक्त संदर्भ क्र ४ मधिल शासन निर्णयाच्या परीच्छेद क्र २ मध्ये नमुद केल्या प्रमाणे ज्या उपकरणांची खरेदी प्रक्रिया दि.१/११/२०१५ पुर्वी सुरु झालेली असेल त्यास सदर शासन निर्णय अस्तित्वात येण्यापुर्वीच्या धोरणानुसार खरेदी प्रक्रिया राबविण्यात यावी मात्र ज्या उपकरणांची खरेदी प्रक्रिया दि.१/११/२०१५ नंतर सुरु झालेली असेल त्या उपकरणांच्या खरेदीसाठी संदर्भ क्र.४ मधिल शासन निर्णया द्वारा निर्धारीत धोरण लागु राहील.
२) कारागृह व न्यायालये यांच्या दरम्यान व्हिडीओ कॉन्फरंन्सींग सुविधेत वाढ करणे करीता खरेदी करण्यात येणाऱ्या उपकरणांची नितांत आवश्यकता पहाता खरेदी करण्यात आलेल्या उपकरणांचा तातडीने विनियोग करण्यात यावा.
३) सदर प्रशासकीय मान्यतेचे आदेश पुढील एक वर्षा करीता ग्राहय रहातील.

४) उपकरणाचे खरेदी मुल्य बाजाराभावा पेक्षा अधिक रहाणार नाही तसेच उपकरणाचा दर्जा उच्च प्रतीचा राहील, याची खात्री करावी.

२. शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र. असंक-२०१५/प्र.क्र.८५/अर्थ-३, दिनांक १७.०४.२०१५ सोबत जोडलेल्या महाराष्ट्र विनियोजन २०१३ या परिशिष्टातील अ.क्र. ३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे अर्थसंकल्पात समाविष्ट असलेल्या योजनांतर्गत जुन्या योजनांच्या स्वरुपात अथवा व्याप्तीत बदल होत नसल्यामुळे प्रस्तुत प्रकरणाच्या खर्चास नियोजन विभाग तसेच वित्त विभागाची मान्यता घेण्याची आवश्यकता नाही.

३. राज्यातील कारागृह व न्यायालयातील व्हिडीओ कॉन्फरंन्सींग सुविधेमध्ये वाढ करण्याच्या दृष्टीने व्हिडीओ कॉन्फरंन्सींग उपकरणे खरेदी करण्यासाठी सन २०१५-१६ या वित्तीय वर्षात राज्य योजनांतर्गत योजनेच्या मंजूर झालेल्या रुपये १६०.०० लक्ष (रुपये एक कोटी साठ लाख फक्त) इतक्या रक्कमेस प्रशासकीय मान्यता देण्यात येत असुन होणारा खर्च सन २०१५-१६ या वित्तीय वर्षात मागणी क्र. बी-५ मुख्य लेखाशीर्ष २०५६- तुरुंग(००)(१०१), (००) (१९) तुरुंगातील व्हिडीओ कॉन्फरन्सिंग सुविधा (२०५६ ०२४२),१३ कार्यालयीन खर्च, ५२ यंत्रसामग्री व साधनसामग्री या लेखाशीर्षाखाली उपलब्ध होणाऱ्या मंजूर तरतूदीतून भागविण्यात यावा.

४. शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र. असंक-२०१५ /प्र.क्र.८५/अर्थ-३, दिनांक १७.०४.२०१५ नुसार बिम्स प्रणालीवर प्राप्त अनुदान रु. १,१२,००,०००/- (रु. एक कोटी बारा लाख फक्त) खर्च करण्यास शासन मंजूरी देत आहे.

५. वित्त विभाग शासन निर्णय क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम, भाग-२, दि.१७.०४.२०१५ व वित्तीय अधिकार नियम पुस्तिका, १९७८ मधील भाग-पहिला, उप विभाग-दोन, अनुक्रमांक-४, नियम ७ मधील स्तंभ ६ मध्ये नमूद करण्यात आलेल्या अटीस अधीन राहून तसेच प्रशासनिक विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारास अनुसरुन हा शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१५१२३११५०१३१३७२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Deepak Keshav Jadiye

Digitally signed by Deepak Keshav Jadiye
DN: c=IN, o=Govt. of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Deepak Keshav Jadiye
Date: 2016.01.01 11:45:14 +05'30'

(दीपक जडीये)
कक्ष अधिकारी

प्रत,

१) अपर पोलीस महासंचालक व कारागृह महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, पुणे,

२) कारागृह उपमहानिरीक्षक (मुख्यालय) , महाराष्ट्र राज्य, पुणे,

३) कारागृह उपमहानिरीक्षक, (पश्चिम विभाग)/पूणे,
४) कारागृह उपमहानिरीक्षक, (मध्य विभाग)/औरंगाबाद,
५) कारागृह उपमहानिरीक्षक, (पूर्व विभाग)/नागपूर,
६) महालेखापाल, महाराष्ट्र (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य १ मुंबई,
७) महालेखापाल, महाराष्ट्र (लेखा परिक्षा), महाराष्ट्र राज्य १ मुंबई,
८) महालेखापाल, महाराष्ट्र (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य २ नागपूर,
९) महालेखापाल, महाराष्ट्र (लेखा परिक्षा), महाराष्ट्र राज्य २ नागपूर,
१०) जिल्हा कोषागार अधिकारी, पूणे, कोल्हापूर, नागपूर, ठाणे,
११) अवर सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२,
१२) अवर सचिव (बीयुडी-१) गृह विभाग, मंत्रालय, मुंबई -३२,
१३) निवड नस्ती (तुरुंग-२).